संदर्भ : महाराष्ट्र टाइम्स आवृत्ती : पुणे दि. ३१ डिसेंबर २०१८ पान नं. १

**मटा अँकर** उणे गुण मिळविलेल्यांची शिफारस

# महापरीक्षा पोर्टलचा गोंधळ चव्हाट्यावर

Harsh.Dudhe
@timesgroup.com
Tweet : @harshdudhe_MT

मटा विशेष

**पुणे** : महापरीक्षा पोर्टलने घेतलेल्या सहायक गुप्तवार्ता अधिकारी सरळसेवा भरती परीक्षेच्या प्राथमिक गुणवत्ता यादीत २०० पैकी -१०, २, ५, ७, ८ असे गुण मिळालेल्या २७९ परीक्षार्थ्यांची सहायक गुप्तवार्ता अधिकारी पदासाठी शिफारस केली जाणार आहे. या यादीनुसार पोलिस विभागाने कागदपत्रांची पडताळणी आणि शारीरिक चाचणीचा कार्यक्रम आखला आहे. या प्रकारामुळे महापरीक्षा पोर्टलचा बोगस कारभार पुन्हा चव्हाट्यावर आला असून, बहुचर्चित मेगाभरतीतदेखील गोंधळ होण्याची शक्यता वर्तविली आहे.

राज्य सरकारची पदभरती आणि बहुचर्चित मेगाभरती पोर्टलद्वारे होणाऱ्या परीक्षांद्वारे होणार आहे. आयटी विभागाच्या महापरीक्षा पोर्टलने या वर्षी १३ आणि १४ जुलैला २०४ जागांसाठी सहायक गुप्तवार्ता अधिकारी सरळसेवा भरती परीक्षा ऑनलाइन स्वरूपात घेतली. परीक्षेला राज्यातून सुमारे ६६ हजार परीक्षार्थी बसले होते. या परीक्षेचा निकाल पोलिस विभागाच्या वेबसाइटवर तीन दिवसांपूर्वी जाहीर करण्यात आला. निकालामध्ये २७९ परीक्षार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. पोलिस विभागाने परीक्षार्थ्यांना ९ जानेवारीला कागदपत्रांची पडताळणी आणि शारीरिक चाचणीसाठी मुंबईला बोलावले आहे.

यातील अनेक परीक्षार्थ्यांचे गुण हे १००च्या आत आहे. यादीत -१०, २, ५, ७, ८, २०, ५७, ६५ असे कमी गुण मिळालेल्या परीक्षार्थ्यांची नावे आहेत; तर, १६८, १३८, ११४ गुण मिळालेल्या परीक्षार्थ्यांची नावे गुणवत्ता यादीत नाहीत. या गुणवत्ता यादीतील प्रसिद्ध करण्यात आलेल्या निम्म्यापेक्षा अधिक परीक्षार्थ्यांचे गुण ५० च्या आत आहेत. या कारणामुळे परीक्षार्थ्यांमध्ये संतापाची लाट असून, निकाल नव्याने जाहीर करण्याची मागणी परीक्षार्थ्यांनी केली आहे.

**महापरीक्षा पोर्टलच्या मनमानी कारभाराबाबत येत्या दोन जानेवारीला आयटी विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट घेणार आहे. वेळ पडल्यास आंदोलन किंवा उपोषण करू.**

– बच्चू कडू, आमदार

**सहायक गुप्तवार्ता अधिकारी सरळसेवा भरती परीक्षेत मला १३८, तर माझ्या मित्राला १६८ गुण आहेत, मात्र आमच्या दोघांचे नाव गुणवत्ता यादीत नाही. या यादीत -१० गुण मिळालेल्या परीक्षार्थ्यांचे नाव आहे.**

– राहुल कवठेकर, परीक्षार्थी